
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2020
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड झाल्याबद्दल डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार करताना 'तरुण भारत'चे संपादक जयवंत मंत्री. सोबत निवासी संपादक मनोज साळुंखे, सोशल मीडिया प्रमुख प्रसाद सु. प्रभु.

12 NOV 2020

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पाऊलखुणांचा शोध'मधून समतोल जीवनाचा प्रत्यय

## कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे; बी. एस. पाटील यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**कोल्हापूर : पुस्तक प्रकाशन समारंभात (डावीकडून) प्रा. डॉ. रणधीर शिंदे, चंद्रकांत कुंभार, प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. माणिकराव साळोखे, बी. एस. पाटील, प्रा. डॉ. अनिल भोसले, भाग्यश्री पाचोटे.**

कोल्हापूर, ता. ११ : 'पाऊलखुणांचा शोध' या आत्मचरित्रातून समतोल जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन घडते, असे प्रतिपादन भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी आज केले. त्यांच्या हस्ते आज पुस्तकाचे प्रकाशन झाले. या पुस्तकाचे लेखन शिवाजी विद्यापीठाचे माजी वित्त व लेखाधिकारी बी. एस. पाटील यांनी केले आहे. हा प्रकाशन समारंभ ऑनलाईन झाला. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

कुलगुरू डॉ. साळुंखे म्हणाले, ''यामध्ये ज्यांनी जीवनात कणभर बदल घडविले, त्यांचे मणभर, भरभरून कौतुक केले आहे. कृतज्ञता हे मूल्य या आत्मचरित्रातून दिसते. त्यात आत्मप्रौढी नाही, तर उलट समतोल जीवनाचे दर्शन त्यातून घडते. मोठेपणाचा अभिनिवेश न दाखवता सहजसोप्या पद्धतीने वाचकांशी संवाद साधण्याची शैली यात डोकावते.''

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''पुस्तक वाचताना मागील पिढीतील प्रत्येकजण त्याच्याशी जोडला जातो. पाटील यांनी लेखन, वाचन, पर्यटन, छायाचित्रण अशा अनेक प्रांतात मुक्त विहार केला आहे.''

लेखक बी. एस. पाटील म्हणाले, ''चांगलं पाहिलेलं, वाचलेलं याविषयीच्या नोंदी डायरी स्वरूपात ठेवण्याची सवय मला आहे. भेटलेल्या माणसांच्या नोंदीही ठेवतो. या नोंदींचा आत्मचरित्र लिहिताना उपयोग झाला. तथापि, त्याकडे आत्मचरित्र म्हणून मी पाहात नाही, तर मला भेटलेल्या, मी अनुभवलेल्या माणसांविषयीच्याच नोंदींचा संचय आहे.''

डॉ. रणधीर शिंदे यांनी पुस्तकाविषयी विवेचन केले. डॉ. अरुण भोसले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. भाग्यश्री प्रकाशनाच्या भाग्यश्री कासोटे-पाटील यांनी आभार मानले.

12 NOV 2020

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रदूषणमुक्तीचा आराखडा बनवूया

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; विविध संस्थांसह विद्यापीठातर्फे स्वच्छ हवा कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ११ : हवेच्या प्रदूषणाचा मानवी जीवनावर मोठा परिणाम होत आहे. शुद्ध हवा जशी प्रत्येकाची गरज आहे तशीच ती शुद्ध ठेवण्याचीही जबाबदारी सर्वांची आहे. यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा या शहरांच्या प्रदूषणमुक्तीसाठी पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासकांनी आराखडा बनवावा. विविध सामाजिक संस्था, संघटना यांचा यामध्ये सहभाग असावा. याची प्रभावी अंमलबजावणी करून आपण हवा प्रदूषणमुक्त करूया, असा मनोदय शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. फटाकेमुक्त दिवाळी साजरा करून हवा स्वच्छ ठेवूया, असे आवाहनही केले होते.**



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागातर्फे आयोजित ऑनलाईन कार्यशाळेत सहभागी आसावरी जाधव, उदय गायकवाड, डॉ. पी. डी. राऊत आदी.**

महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमा अंतर्गत ऑनलाईन कार्यशाळेचे आज आयोजन केले.

कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठातील पर्यावरण विभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव ह्यांनी स्वागत व पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनातील विद्यापीठाची भूमिका स्पष्ट केली. प्रदूषण मंडळाच्या वतीने मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. पी.डी. राऊत ह्यांनी कोल्हापूर हवा प्रदूषण आणि सद्यःस्थिती याबद्दल व्याख्यान दिले.

प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी हवा प्रदूषणविषयक कायदेशीर बाबींची माहिती दिली. शहर हवा प्रदूषण नियंत्रण आराखड्याबाबत समीर व्याघ्राम्बरे, पर्यावरण अधिकारी यांनी माहिती दिली.

पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड, पर्यावरणतज्ज्ञ ह्यांनी हवाप्रदूषण नियंत्रणाबाबत आराखड्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करता येईल याबद्दल माहिती दिली.

या वेळी डॉ. शिर्के म्हणाले, "सांगली, सातारा व कोल्हापूर शहरातील हवा प्रदूषणमुक्त करण्यासाठी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने आराखडा बनवला पाहिजे. यामध्ये या विषयातील तज्ज्ञांचा सहभाग असला पाहिजे. या आरखड्याची प्रभावी अंमलबजावणी करून प्रदूषणमुक्तीच्या दिशेने काम करणे आवश्यक आहे."

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2020
पुढारी

# स्वच्छ हवेसाठी कोल्हापूर, सांगली, साताऱ्याचा आराखडा करू : डॉ. शिर्के

## राष्ट्रीय स्वच्छ हवा अभियानांतर्गत कार्यशाळेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

फटाकेमुक्त दिवाळी साजरी करून कोल्हापूरची हवा स्वच्छ ठेवू. स्वच्छ हवेसाठी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांचा आराखडा तयार करू. विद्यार्थी व शिक्षकांच्या मदतीने पर्यावरण क्षेत्रातील व्यक्ती, कार्यकर्ते, संघटना, प्रदूषण नियंत्रण मंडळ, महापालिका यांच्यावतीने आराखडा राबविण्यात यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी राष्ट्रीय स्वच्छ हवा अभियानांतर्गत कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी केले.

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरण विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी पर्यावरण संरक्षण व संवर्धनातील विद्यापीठाची भूमिका स्पष्ट केली. प्रा. डॉ. पी.डी. राऊत यांनी 'कोल्हापूर हवा प्रदूषण व सद्यःस्थिती' याविषयी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी हवा प्रदूषण विषयक कायदेशीर बाबींची माहिती दिली.

कोल्हापूर शहर हवा प्रदूषण नियंत्रण आराखड्याबाबत महापालिकेचे पर्यावरण अधिकारी समीर व्याघ्रांबरे माहिती सांगितली. पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड यांनी, हवा प्रदूषण नियंत्रणाबाबत आराखड्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करता येईल याची माहिती दिली. प्राजक्ता सरकाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2020
तरुण भारत

# पर्यावरणपूरक शहरांसाठी कृती आराखडा तयार करा

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाच्या महामारीने जनजीवन विस्कळीत झाले आहे. पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी फटाके उडवू नयेत. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करून, कोल्हापूरच्या जनतेला स्वच्छ हवा देऊया. यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ, महापालिका आणि पर्यावरण विभागाच्यावतीने कृती आराखडा तयार करुया. या आराखड्याची अंमलबजावणी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यात करावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभाग, कोल्हापूर महापालिका आणि प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्वच्छ हवा अभियानांतर्गत ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोल्हापूर शहर पश्चिम घाटातील निसर्गाचे वरदान आहे. असे असताना भारतातील १०२ शहरांपैकी एक किंवा महाराष्ट्रातील १७ प्रदूषित शहरांपैकी एक असे मानांकन कोल्हापूर शहराला मिळणे अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे या दृष्टीने हवा प्रदूषणाबाबत जनजागृती करण्यासाठी हा प्रयत्न केला जात आहे.

12 NOV 2020

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा अखेर पूर्ण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा अखेर मंगळवारी पूर्ण झाल्या. तीनवेळा परीक्षांच्या तारखा पुढे ढकलल्याने परीक्षाबांबत संभ्रमावस्था निर्माण झाली होती. मात्र काही तुरळक त्रुटी वगळता परीक्षा सुरळीत पार पडली. आजपर्यंत १७० अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्ण झाल्या असून १०० अभ्यासक्रमांचे निकालही जाहीर करण्यात आले आहेत.



## १०० हून अधिक अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

अंतिम वर्षाच्या परीक्षा विनाअडथळा पार पडल्यामुळे शिवाजी विद्यापीठाने राज्यात आदर्श निर्माण केला आहे.

आजअखेर १७० अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्ण झाल्या असून १०० हून अधिक निकालही जाहीर करण्यात आले आहेत. जे विद्यार्थी कोरोनामुळे अथवा तांत्रिक कारणास्तव परीक्षा देऊ शकले नाहीत त्यांची परीक्षा दिवाळी नंतर घेण्यात येणार असल्याची माहिती परीक्षा विभागाचे नियंत्रक डॉ. गजानन पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2020
पुढारी

# शैक्षणिक वर्ष सत्रारंभ, सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित

## शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये आणि विद्यापीठ शैक्षणिक वर्ष सत्रारंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करण्याबाबतचा निर्णय शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठकीत घेण्यात आला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. परीक्षा निकाल व महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभाग सुरू करणे आदी विषयांवर चर्चा झाली.

पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रथम सत्र समाप्ती ११ नोव्हेंबर रोजी होणार आहे. द्वितीय सत्रारंभ २ डिसेंबरला होईल व सत्र समाप्ती मे २०२१ मध्ये होणार आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांच्यासह व्यवस्थापन परिषद सदस्य उपस्थित होते.

12 NOV 2020 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यवस्थापन परिषद सदस्य मांडणार शिवाजी विद्यापीठ विकासाचे 'व्हिजन'

## २५ नोव्हेंबरला बैठक : पदभरतीबाबत आस्थापना विभागाला सूचना

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पुढील पाच वर्षांतील विकासाचे व्हिजन प्रत्येक व्यवस्थापन परिषद सदस्य मांडणार आहेत. त्यासाठी दि. २५ नोव्हेंबरला बैठक होणार आहे. तंत्रज्ञान अधिविभागातील सहयोगी, सहायक प्राध्यापकांच्या पदभरतीबाबतचा अहवाल आस्थापना विभाग सादर करणार आहे.

विद्यापीठात मंगळवारी व्यवस्थापन परिषदेची बैठक झाली. त्यामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी, या परिषदेतील सदस्यांनी विद्यापीठाच्या विकासाबाबतच्या त्यांच्या संकल्पना, योजनांचा समावेश असणारे व्हिजन सादर करावे, असे आवाहन केले आहे. त्यानुसार या परिषदेतील सदस्य हे विद्यापीठाबाबतचे आपआपले व्हिजन दि. २५ नोव्हेंबरच्या बैठकीमध्ये सादर करणार आहेत.

तंत्रज्ञान अधिविभागामध्ये सहयोगी, सहायक प्राध्यापकांच्या एकूण ५२ पदांची भरती केली जाणार आहे. त्याबाबतचा अहवाल आस्थापना विभागाने सादर करावा, अशी सूचना या परिषदेने विद्यापीठ प्रशासनाला केली आहे. विविध विद्याशाखांच्या सत्रारंभ, सत्रसमाप्तीच्या सुधारित तारखांना मान्यता देण्यात आली.

### विद्यापीठाच्या द्वितीय सत्राचा २ डिसेंबरला प्रारंभ

- विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांतील विविध विद्याशाखांच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या सत्राचा प्रारंभ दि. २२ जूनला झाला.
- हे सत्र बुधवारी संपले असून, द्वितीय सत्राचा प्रारंभ दि. २ डिसेंबरला होईल. यातील पदवीचे सत्र हे दि. १० मे रोजी, तर पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे सत्र दि. २५ मे रोजी संपणार आहे.
- विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार या सत्राच्या सुधारित तारखा विद्यापीठाने मंगळवारी जाहीर केल्या.
- त्याबाबत अधिविभाग, महाविद्यालयांना कळविण्यात आले असल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2020
पुढारी

# विद्यापीठाचा ५८ वा वर्धापन दिन होणार साधेपणाने साजरा

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा)** : शिवाजी विद्यापीठाचा बुधवारी (दि. १८) होणारा ५८ वा वर्धापन व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार कोरोना संसर्गजन्य रोगामुळे साधेपणाने साजरा करण्यात येणार आहे. दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे होणारे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. वर्धापन दिनानिमित्त दि. १८ रोजी सकाळी १०.३० वा. विद्यापीठ प्रांगणात कुलगुरू, प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभहस्ते ध्वजारोहण होईल. विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा सुरू आहेत. वर्धापन दिनादिवशी कार्यालयीन व पदव्युत्तर विभागाची कामकाजाची वेळ सकाळी ८.०० ते ११.३० अशी राहील, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2020
तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# विद्यापीठमध्ये उद्यापासून दिवाळीची सुट्टी



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाला शुक्रवार १३ ते १६ नोव्हेंबर या कालावधीत दिवाळीची सुट्टी असणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेल्या आठ महिन्यापासून विद्यापीठाचा गाडा यशस्वीपणे ऑनलाईन चालवणाऱ्या कर्मचाऱ्यांनी दिवाळीची पूर्णपणे सुट्टी दिली जाणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. तसेच पदवी अंतिम सत्राच्या परीक्षा पूर्ण झाल्या आहेत. या परीक्षांचे आतापर्यंत १०० निकाल जाहीर झाले आहेत. तर उर्वरीत निकाल निकाल जाहीर करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. दिवाळीच्या सुट्टीपुर्वी बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी.चे सर्व निकाल जाहीर करण्याचा प्रयत्न परीक्षा विभागाचा आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2020
तरुण भारत

# विद्यापीठाच्या वस्तुसंग्रहालयशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेश सुरु

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाच्यावतीने आयोजित वस्तुसंग्रहालयशास्त्र या पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. एक वर्षाच्या या कोर्ससाठी १९ ते २७ नोव्हेंबर दरम्यान ऑफलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज घेण्यात येणार आहे. १ व २ डिसेंबर दरम्यान अर्जाची छाननी करण्यात येणार आहे. तर अंतिम यादी ३ ते ८ डिसेंबर या कालावधीमध्ये प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी इतिहास अधिविभागाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2020
पुण्यनगरी

# वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका प्रवेश सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका या एक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दि. १९ ते २७ नोव्हेंबर या कालावधीत ऑफलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज घेण्यात येणार असून, अर्ज छाननी १ व २ डिसेंबर रोजी करण्यात येणार आहे. अंतिम यादी दि. ३ ते ८ डिसेंबर या कालावधीत प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 NOV 2020
पुढारी

संक्षिप्त

# शिवाजी विद्यापीठातील ३५ जणांना 'कॅस' अंतर्गत पदोन्नती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापकांसह इतर ३५ जणांना 'कॅस' अंतर्गत पदोन्नती देण्यात आल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून प्राध्यापकांच्या पदोन्नती प्रलंबित आहेत. यासंदर्भात प्राध्यापकांकडून विद्यापीठ प्रशासनाकडे विचारणा केली जात होती. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर 'कॅस' पदोन्नती करताना अडचणी येत होत्या. विद्यापीठाच्या वतीने यासंदर्भात कॅम्प लावण्यात आला. विद्यापीठाने बुधवारी प्राध्यापक, वरिष्ठ प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक अशा ३५ जणांना पदोन्नती दिल्या आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

12 NOV 2020

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोनकवडेंचे निर्जंतुकीकरणासाठी शास्त्रीय पर्याय



प्रा. सोनकवडे

**कोविडच्या संकटावर मात करण्यासाठी देशभरातील तंत्रज्ञांनी पुढाकार घेतला होता. त्यापैकी एक नाव म्हणजे प्रा. आर. जी. सोनकवडे. युव्ही सॅनिटायझर टनेल, युव्ही टॉर्च, युव्ही सॅनिटायझर मॉड्यूल आदींच्या माध्यमातून त्यांनी निर्जंतुकीकरणाचे शास्त्रीय पर्याय उपलब्ध केले. नुकत्याच पार पडलेल्या जागतिक विज्ञान दिनाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...**

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागाचे संशोधक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी दिल्लीमधील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या इंटर युनिव्हर्सिटी अक्सलरेटर सेंटर येथे वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते. त्याचबरोबर त्यांनी अनेक केंद्रीय आणि राज्य विद्यापीठांच्या वैधानिक समितीचे सदस्य म्हणून काम पाहिले आहे. नॅक समितीचे सदस्य म्हणून कार्यरत असताना विद्यापीठे, राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था यांचे परीक्षण त्यांनी केले आहे. न्युक्लिअर ट्रॅक सोसायटी ऑफ इंडियाचे दोन वेळा अध्यक्ष होते. काही दिवसांपासून सॅनिटायझर टनेल, यूव्ही टॉर्च आणि आता नुकताच उद्घाटन झालेल्या युव्ही सॅनिटायझर मॉड्युलमुळे प्रा. सोनकवडे प्रकाशझोतात आले

## » प्रासंगिक

आहेत. कोरोनाचा सामना करतानाची महत्त्वाची पायरी म्हणजे गर्दीच्या ठिकाणी लोकांचे निर्जंतुकीकरण करणे. या हेतूने सोनकवडे यांनी माटुंगा येथील रासायनिक तंत्रज्ञान संस्थेच्या मदतीने कमी खर्चातही अत्याधुनिक अशा सॅनिटायझर टनेलची निर्मिती केली.

याव्यतिरिक्त विषाणू निष्क्रिय करण्यासाठी दुसरा उत्तम पर्याय म्हणजे विषाणूंवर अतिनील किरणांचा मारा करणे. या अतिनील किरणांचा उपयोग करून प्रा. सोनकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली अनिकेत सोनकवडे आणि पूनम सोनकवडे या भावंडांनी यूव्ही टॉर्च तयार केला आहे. यातील अतिनील किरणे मानवी शरीराच्या प्रत्यक्ष संपर्कात न आणता हाताळण्यास सोपा असणारा हा यूव्ही टॉर्च निर्जंतुकीकरण सहजसोपे करण्यास खूपच उपयुक्त ठरतोय. त्यांनी 'यूव्हीसी- सॅनिटायझर मॉड्युल' (तारा) नामक निर्जंतुकीकरण करणारा रोबोट कृत्रिम बुद्धिमत्ता, आयओटी तंत्रज्ञान आणि वेगवेगळ्या कामासाठी वापरलेले सेन्सर हे सगळे या रोबोटला एका विशिष्ट उंचीवर नेत. या रोबोटच्या निर्मितीमध्ये अनिकेत सोनकवडे, युट्रॉनिक्स टेक्नॉलॉजीचे रत्नदीप कांबळे, पवन खोब्रागडे, समीर रामटेके आदींचा सहभाग आहे. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत आणि उद्योग मंत्रालयाचे आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे यांचे प्रोत्साहनही प्रा. सोनकवडे यांना मिळाले.

जनसंपर्क कक्ष

12 NOV 2020 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'महावीर'ला स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा

**रमणमळा :** श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ संचालित महावीर महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग व शिवाजी विद्यापीठ यांच्याकडून स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाल्याची माहिती प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांनी दिली. पारंपरिक महाविद्यालयात स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळवणारे महावीर महाविद्यालय हे जिल्ह्यातील दुसरे महाविद्यालय आहे. दहा वर्षांसाठी स्वायत्त दर्जा मिळाला असून, तो शैक्षणिक स्वरूपाचा आहे. यामुळे महाविद्यालयास स्वतःचा अभ्यासक्रम तयार करणे, प्रवेश सुरू करणे, शुल्क आकरणी, परीक्षा घेणे, पदवी देणे म्हणजे प्रवेशापासून पदवीपर्यंत सर्व अधिकार मिळणार आहेत. महाविद्यालयास स्थानिक गरजेचा व विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारित अभ्यासक्रम सुरू करण्यास स्वतंत्रता मिळणार आहे. महाविद्यालयाची शिवाजी विद्यापीठाशी संलग्नता कायम राहणार असून, अनेक नव्या गोष्टींसाठी तातडीने कार्यवाही करण्यास स्वातंत्र्य मिळणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तसेच संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे, संस्थेचे चेअरमन ॲड. के. ए. कापसे, सेक्रेटरी एम.बी.गरगटे, सर्व संचालक, प्राध्यापकांनी याबद्दल आनंद व्यक्त केला.

लोकमत

# कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील हवा स्वच्छतेचा कृती आराखडा

## कुलगुरू डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेतून पाऊल

■ लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : कोल्हापूरसह सांगली, सातारा जिल्ह्यांतील हवा स्वच्छ ठेवण्यासाठी आराखडा तयार करूया. विद्यार्थी, शिक्षकांच्या मदतीने पर्यावरण क्षेत्रातील व्यक्ती, कार्यकर्ते, संघटना, प्रदूषण नियंत्रण मंडळ, महानगरपालिका यांच्या माध्यमातून हा आराखडा राबवूया. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करून, कोल्हापूरची हवा स्वच्छ ठेवूया, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी येथे केले.

कोल्हापूर शहरातील हवा प्रदूषण नियंत्रण आणि जनजागृतीसाठी महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ, शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभाग यांच्यातर्फे आयोजित 'राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमा'अंतर्गत ऑनलाईन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पर्यावरणतज्ज्ञ डॉ. पी. डी. राऊत यांनी कोल्हापुरातील हवा प्रदूषण आणि सद्य:स्थितीची माहिती दिली. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी हवा प्रदूषणविषयक कायदेशीर बाबींची माहिती दिली. पर्यावरण अधिकारी समीर व्याघ्रांबरे यांनी शहराच्या हवा प्रदूषण नियंत्रण आराखड्याबाबतची माहिती दिली. याची अंमलबजावणी कशा प्रकारे करता येईल, याबाबत पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. पर्यावरण विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी स्वागत केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.



कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठामधील राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमाअंतर्गत ऑनलाईन कार्यशाळेत पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी आसावरी जाधव, पी. डी. राऊत, उपस्थित होते.

### हवा प्रदूषणाबाबत जनजागृती

देशातील १०२ शहरांपैकी एक किंवा महाराष्ट्रातील १७ प्रदूषित शहरांपैकी एक असे मानांकन कोल्हापूर शहराला मिळणे म्हणजे अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे या दृष्टीने जनमानसात हवा प्रदूषणाबाबत जनजागृतीसाठी पर्यावरणशास्त्र विभाग, महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाऊल टाकले आहे.